दिनांक.२८/०९/२०१८

# प्रेसनोट

## भारती विद्यापीठ पोलीसांनी सराईत गुन्हेगाराकडून तीन गावठी कट्टे व जिवंत काडतुसे केले जप्त

दि.२७/०९/२०१८ रोजी भारती विद्यापिठ पोलीस ठाणे हददीत गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड स्टाफसह पेट्रोलींग करीत असताना **सहा.पोलिस फौजदार प्रदीप गुरव व पोलीस नाईक गणेश सुतार** यांना त्यांचे गुप्त बातमीदारा कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे हनुमंत गोरखे याचेकडे गावठी कटटे असुन तो ते विक्री करणेसाठी सच्चाईमाता मंदीराशेजारी पाण्याचे टाकीजवळ येणार असुन त्याने अंगामध्ये ग्रे रंगाचे जर्कीग घातलेले असुन त्यावर पाठीमागील बाजुस जगदंब असे लिहलेले आहे व निळया रंगाची पॅन्ट घातलेली आहे.तो अंगाने सडपातळ आहे. अशी माहीती मिळाल्याने सदर बातमी वरीष्ठांना कळविली असता त्यांनी योग्य कारवाई करण्याबाबत दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार स्टाफसह साध्या कपडयात सच्चाईमाता मंदीराशेजारी पाण्याचे टाकीजवळ आंबेगाव खुर्द पुणे येथे स्टाफसह येवून सदर ठिकाणी आजुबाजुस आडोश्याला वेगवेगळया ठिकाणी सापळा रचुन थांबलो असता बातमी प्रमाणे नमुद इसम हा पांढेर रंगाचे पोत्याची पिशवी हातामध्ये घेवुन वाघजाईनगर दुगड शाळेकडुन पाण्याचे टाकीच्या दिशेने पायी चालत येत असल्याचे दिसला तेव्हा तो संशयितरित्या इकडे तिकडे पाहत येत होता त्याच्या हालचाली संशयित असल्याने त्याची बारकाईने पाहणी केली असता मिळालेल्या बातमी प्रमाणे तोच हनुमंत गोरखे असल्याची खात्री झाल्याने पो. उप निरीक्षक श्री गायकवाड व स्टाफने त्यास कव्हर करुन १७.२० वाजण्याचे सुमारास सच्चाईमाता मंदीराशेजारी पाण्याचे टाकीजवळ आंबेगाव खुर्द पुणे येथे पकडुन जेरबंद केले लागलीच त्याचे हातातील पिशवीची झडती घेता त्यामध्ये तीन गावठी कटटे व तीन जिवंत पितळी काडतुसे मिळुन आले त्यास निशस्त्र करून त्यास नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **हनुमंत विठठल गोरखे वय.३५ वर्ष रा.३८/२ गणपती मंदीराजवळ बालवीर मित्र मंडळ शेजारील गल्लीमध्ये पर्वती दर्शन पुणे** असे असल्याचे सांगितले त्याचे ताब्यात मिळुन आलेल्या मालाची पाहणी केली असता किं.रु.६०,०००/- चे तीन गावठी कटटे व कि.रु ३००/- चे तीन जिवंत पितळी काडतुसे असा एकुण **कि.रु,६०,३००/-चा ऐवज जप्त** करून त्याबाबत त्याचे कडे गावठी कटटे जवळ बाळगण्यासाठी सक्षम अधिकारी यांचे कडील परवाना आहे काय याबाबत विचारणा केली असता त्याने कसलाही परवाना नसल्याचे सांगितले.

वरील आरोपी याचेवर भारती विद्यापिठ ,स्वारगेट पो.ठाणे येथे शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर साो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह साो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.रविंद्र रसाळ साो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार साो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,गणेश सुतार,समीर बागसिराज,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड यांचे पथकाने केलेली आहे.**

वरीष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे